'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3
ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

# जागतिकीकरणाचा स्त्री जीवनावर होणारा परिणाम

प्रा.डॉ. मीनाक्षी पुंडलिक पाटील
लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय,
पंचवटी नाशिक

*जागतिकीकरणाचा सर्वात जास्त परिणाम स्त्रियांच्या जीवनावर होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला जेव्हा सुरूवात झाली तेव्हा इ. स. १९८९ साली सिंथिया एनलो या स्त्रीवादी विदुषीने प्रश्न उपस्थित केला होता की, 'तुमच्या या जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान काय असेल? त्यांचे यावर एकच म्हणणे होते की, मुक्त बाजार, मुक्त भांडवल स्त्रियांच्या जगातही अभूतपूर्व परिवर्तन करील. मानवी विकासक्रमात जेव्हापासून मातृसत्तेचा पितृसत्तेने निर्णयक पराभव केला, तेव्हापासून स्त्री जी गुलाम झाली ती आजतागायत तशीच आहे. गुलामगिरीच्या अवस्थेत तर ती गुलामांचीही गुलामच होती. भांडवलशाहीत तिला आकर्षक रूप मिळाले, परंतु ती भोगवस्तूच राहिली. समाजवादी देशात ती काही प्रमाणात मुक्त झाली. तिच्यातील सुप्त गुणांच्या प्रकटीकरणाची संधी उपलब्ध झाली, परंतु तिथेही पुरूषी सत्ता तिच्या संधीच्या आड आली. स्त्रियांच्या दृष्टीने भारताचा तर समग्र इतिहासच गुलामी, अपमान आणि लैंगिक शोषणाचा आहे.*

**प्रास्ताविक :—**

स्त्रियांच्या दृष्टीकोनातून बघितले तर असे दिसते की, जागतिक बाजारपेठ उद्योगांच्या विकासातून जन्मलेले संघर्ष केवळ वेतन व कामाची परिस्थिती यांसारख्या आर्थिक प्रश्नावर थांबले नाहीत. दुहेरी रूपाने स्त्रीला त्याशी संघर्ष करावा लागला. जागतिक बाजारपेठ उद्योगांमध्ये स्त्रियांना रोजगार मिळाल्याने खासगीचे राजकीयकरण करण्यासाठी भौतिक आधार प्राप्त झाला आहे. कारण हे कारखाने केवळ कामगार नाही तर स्त्रिया म्हणून एकत्र आणतात. यातून स्त्री कामगारांचा स्त्रिया म्हणून आणि कामगार म्हणून संघर्ष करण्यासाठी पाया निर्माण होतो.

RESEARCH JOURNEY

एकतर स्त्रियांची नैसर्गिक भूमिका ही घराच्या आतली आहे. या पुरूषसत्ताक गृहितकामुळे स्त्रियांविरूध्द भेदभाव केला जातो. याचबरोबर पुरूषसत्तेत हे गृहितक असते की स्त्रिया अनेक प्रकारची वेतनासाठीची कामे करण्यास असमर्थ आहेत. कारण एकतर नैसर्गिकरित्या पुरूषांच्या तुलनेत त्यांची उत्पादकता कमी आहे किंवा त्यांच्या घरगुती जबाबदाऱ्या त्यांच्या वेतनासाठीच्या कामावर प्रतिकूल परिणाम पडू शकतो. अशा ज्या गोष्टींमुळे स्त्रिया श्रमाच्या बाजारपेठेत दुय्यम ठरविल्या जातात. तेच घटक त्यांच्यासाठी फायद्याचे ठरतात. अशा उद्योग आणि सेवांमध्ये जिथे त्या मोठ्या प्रमाणात काम करताना दिसतात. जिथे त्यांचे वेतन हे कुटुंबाला पोसण्यास पुरेसे असत नाही. त्याचाच अर्थ असा की, स्त्रिया या वरकमाईसाठी किंवा फार फार तर पुरूषाला मदत करण्यासाठ‌ पूरक वेतन मिळविण्यासाठी काम करतात. याचाच अर्थ स्त्री श्रमशक्तीसाठीची मागणी आणि पुरवठा हे दोन्ही पुरूषसत्तेच्या संस्कृतीतून ठरत असते. याचाच अर्थ असा की, स्त्रिया श्रमाच्या कोणत्याही टप्प्यातून कितीही कार्य करीत राहिल्या तरी त्यावर पुरूषसत्तेचा अंकुश राहीलच. म्हणजेच स्त्री श्रमशक्तीसाठीची मागणी आणि पुरवठा हे दोन्ही पुरूषसत्तेच्या संस्कृतीतून ठरत असते. स्त्रियांची घरातील, कुटुंबातील भूमिका नैसर्गिक आहे आणि त्या श्रमाच्या बाजारपेठेत दुय्यम स्तरावर आहेत. अनेक वेळा जेव्हा स्त्रिया जास्त उत्पादक आहेत, हे म्हटले जाते, तिथेसुध्दा त्यांना कमी वेतन दिले जाते. एकाच स्तराच्या कौशल्यासाठी जिथे स्त्रिया

मोठ्या प्रमाणात आहेत. अशा उद्योगांमध्ये जिथे पुरूषांचे प्रमाण अधिक आहे, अशा उद्योगांच्या तुलनेत वेतन स्तर कमी असलेला दिसतो.

**जागतिकीकरणाचा स्त्रीजीवनावर होणारा परिणाम**

अनेक वेगवेगळ्या बाजूंनी अर्थव्यवस्थेचा स्त्री जीवनावर परिणाम होत असतो. सर्वात महत्त्वाची लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे स्त्रियांच्या बाबतीत जे सामाजिक नीतीनियम आहेत, त्याची पकड फार कठोर असते. प्रत्येक टप्प्यावर स्त्रीने कसे वागावे? यावर समाजाचे पुरूषसत्तेचे नियमन असते आणि म्हणूनच आर्थिक गरज किंवा स्वयंविकासाची गरज म्हणून स्पर्धात्मक जगात स्त्रिया गेल्या तर मग त्यांना हिंसाचाराला तोंड द्यावे लागते. भारतातील स्त्रिया बहुविध पुरूषसत्तेला सामोरे जातात. पुरूषसत्ताक घरांमध्ये सत्ता, प्रतिष्ठा, दर्जा या गोष्टी त्यांच्या वाट्याला येत नाहीत. त्यामुळे श्रमाच्या बाजारपेठेत कुटुंबांतर्गत स्त्रिया या दुय्यम दर्जाच्या वाहक असतात. स्त्रियांच्या उदरनिर्वाहाचे पर्यायही नव्या अर्थव्यवस्थेत नष्ट होत आहेत.

जागतिकीकरण आणि लवचिक भांडवलशाहीचे फायदे निश्चित करण्यासाठी स्त्री कामगारांना फार मोठी किंमत द्यावी लागली आहे. एकीकडे स्त्रियांच्या बाईपणाचा वापर बाजारपेठेत केला जातो तर दुसरीकडे भिन्न समाज गटातील स्त्रिया ज्या बहुविध भूमिका निभावत असतात. त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मुलेबाळे, चूल आणि स्वंपाकपाणी सांभाळणाऱ्या स्त्रिया कुटुंबाचे व्यवस्थापन करीत असतात आणि भोवतीच्या समाजातही समाजाच्या संघटनेचे काम करत असतात. कुटुंबाचे रीतिरिवाज सांभाळत असतात व ते सांभाळणे विश्रांती या सदरात मोडते.

जागतिकीकरणाचा विचार आर्थिक क्षेत्रापुरता करणे अयोग्य आहे. असंही सर्व अभ्यासक मानतात. व्यवस्थेच्यामार्फत अधिकृतता देवून स्त्रियांचे लैंगिक शोषण करणे, त्यांचा व्यापार करणे हे मोठे चिंतेचे विषय आहेत. इतकेच नव्हे तर टेलिव्हीजन आणि तत्संबंधी आलेले विविध चॅनल्स यातून नवी जागतिक संस्कृती निर्माण करण्याचे प्रयत्न आणि दावे केले जातात. त्यातही स्त्रीजीवन भरडून निघते. या प्रश्नाचा विचार करताना संस्कृती व भौतिक जीवन यांचा विचार सुट्या पध्दतीने केला जातो. जागतिकीकरणाने स्त्रियांना देहविक्रयाकडे नेले असेही म्हटले जाते, पर्यटन व्यवसाय, त्यातून निर्माण केले गेलेले भोगवादी, चंगळवादी उपभोग, त्यात परंपरेचा होणारा साधनावादी उपयोग, स्त्रियांच्या वाट्याला येणारा देहविक्रय, देहप्रदर्शन याचा विचार फक्त भारतीय किंवा हिंदुस्थानी संस्कृतीवरील हल्ला या पध्दतीने करणे चुकीचे ठरेल. कोणत्या स्त्रिया (जात, वर्ग, धर्म) अशा व्यवसायात खेचल्या जातात. अशा तऱ्हेच्या अनेक तारांकित जगण्यासाठी इतकी रोकड ज्यांच्याकडे असते ती निर्माण करणारा ‘जुगारी पैसा’ कसा अधिकृत केला जातो, हे अभ्यासावे लागेल. याचा विचार करताना भारतीय परिस्थितीत पुरूषसत्ताक व्यवस्था, जातीसत्ताक व्यवस्था, वर्गव्यवस्था आणि धार्मिक पंथोपंथ यासंदर्भातील गुंतागुंत लक्षात घ्याव लागेल. नव्या खुल्या अर्थव्यवस्थेत विस्थापित होण्याच्या अनेक रिती आहेत. त्या सर्वांना पर्याय हवे आहेत. त्यामुळे भिन्न परिस्थितीत भिन्न प्रकारे प्रतिकार करणारे लढे उभारले जाणे आणि त्याचवेळी या सर्व प्रतिकारांची दिशा मात्र लोकशाहीवादी प्रतिष्ठा देणारी असावी.

गेल्या पाच दशकांची गोष्ट थोडक्यात अशी आहे की, एका बाजूला भारत देशाने स्त्रियांचे हक्क आणि समता याबाबतची नुसती तोंडी आश्वासनंच दिलेली आहेत. सरकारच्या कुठल्याही धोरणाद्वारा मग ते त्यांचं हरित क्रांतीचं धोरण असू दे, निर्यातवाढीचं किंवा मुक्त व्यापार क्षेत्राबाबतचं धोरण असू दे, स्त्री कामगार मुख्य आर्थिक प्रवाहाच्या अधिकच बाहेर फेकल्या गेल्या आहेत. हा ही विचार प्रामुख्याने लक्षात घेणे गरजेचे आहे.

भारतातल्या सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त गरीब कुटुंबांमध्ये स्त्रियांचं घर चालवतात आणि त्यांच्या प्राप्तीवर घर चालते. मध्यमवर्गामध्ये बहुतांश स्त्रियांच्या उत्पादनाचा उपयोग, राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी केला जातो. उदा. घर विकत घेणे, मुलांना कॉन्व्हेंट शाळेत पाठविणे, आर्थिक स्वातंत्र्य म्हणजेच मिळवती स्त्री हे वास्तव तिच्या स्वातंत्र्याची किंवा स्वायत्ततेची खूण म्हणून मानता येणार नाही. भारतीय स्त्री सातासमुद्रापार गेली. तिच्या बौध्दिक प्रगल्भतेचे, क्रयशक्तीचे जागतिकीकरण झाले पण संस्कृतीचे जोखड मात्र तिच्यासोबत राहिले. जागतिकीकरणानेही स्त्रियांची परंपराच्या बेडीतून सुटका मात्र केली नाही.

जागतिकीकरणाचा सर्वात जास्त परिणाम स्त्रियांच्या जीवनावर होत आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला जेव्हा सुरूवात झाली तेव्हा इ. स. १९८९ साली सिंथिया एनलो या स्त्रीवादी विदुषीने प्रश्न उपस्थित केला होता की, 'तुमच्या या जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान काय असेल? त्यांचे यावर एकच म्हणणे होते की, मुक्त बाजार, मुक्त भांडवल स्त्रियांच्या जगातही अभूतपूर्व परिवर्तन करील. मानवी विकासक्रमात जेव्हापासून मातृसत्तेचा पितृसत्तेने निर्णायक पराभव केला, तेव्हापासून स्त्री जी गुलाम झाली ती आजतागायत तशीच आहे. गुलामगिरीच्या अवस्थेत तर ती गुलामांचीही गुलामच होती. भांडवलशाहीत तिला आकर्षक रूप मिळाले, परंतु ती भोगवस्तूच राहिली. समाजवादी देशात ती काही प्रमाणात मुक्त झाली. तिच्यातील सुप्त गुणांच्या प्रकटीकरणाची संधी उपलब्ध झाली, परंतु तिथेही पुरूषी सत्ता तिच्या संधीच्या आड आली. स्त्रियांच्या दृष्टीने भारताचा तर समग्र इतिहासच गुलामी, अपमान आणि लैंगिक शोषणाचा आहे. भारतातील अनेक मागासलेल्या जातींनी मुक्तीचे लढे केले परंतु त्या जातीतही स्त्री बध्दच राहिली. मानवी विकासक्रमातील ऐतिहासिक अवस्था कोणतीही असो, राज्यव्यवस्था कोणतीही असो, माणसे कोणत्याही धर्माची असोत, त्या सर्वात स्त्रीदास्य समान असते. आजच्या ग्रामीण महाराष्ट्राचा विचार करायचा ठरला तर संपूर्ण ग्रामीण विभागाची अर्थव्यवस्थ ही पूर्णपणे स्त्रियांच्या शोषणावर उभी आहे. शहरातही स्त्री नोकरी करू लागली व दुहेरी तणावास सामोरी जावू लागली. याचे प्रतिबिंब प्रस्तुत आत्मकथनातील स्त्री जीवनावर पडलेली दिसतात.

**समारोप :**

सरिता वाकलकरांचे जॅकपॉट हे आत्मकथन व्यवसायाचे एक नवे क्षेत्र निवडलेल्या स्त्रीचे अनुभवकथन आहे. हॉर्स रेसिंगच्या क्षेत्रात नवे पाऊल टाकून मोठा जग बसवणारी ही स्त्री जागतिकीकरणाचा एक सकारात्मक परिणाम म्हणून पाहता येते, सरिता वाकलकर अत्यंत सामान्य कुटुंबातील होत्या. परंतु आपल्या जिद्दीच्या जोरावर त्यांनी या जगावेगळ्या क्षेत्रात आत्मविश्वासाने पाऊल टाकले. त्यात त्या यशस्वी झाल्या. त्या म्हणतात, 'हॉर्स रेसिंग या क्षेत्रात सहसा बायका पडत नाहीत. मध्यमवर्गातील लोक मुळातच हॉर्स रेसिंग, जुगार म्हणूनच ओळखतात. आज एकविसाव्या शतकातली सात वर्षे उलटल्यानंतरही हे क्षेत्र तेवढेच बदनाम आहे. श्रीमंत लोकांचा पैसे उडवायचा छंद अशा दृष्टीनेच हॉर्स रेसिंगकडे पाहिलं जातं' (पृ १२७) असं म्हणत असताना सरिता वाकलकर हॉर्स रेसिंग या क्षेत्राला स्वत:च्या आनंदाचे, प्रसन्नतेचे आधारस्थान म्हणून पाहतात. त्यांचा छंद, त्यांची नोकरी व त्यांचा आनंद त्याच्याशीच जोडलेला होता.

'भोगले जे दु:ख त्याला' या आत्मकथनाच्या लेखिका आशा अपराद या जागतिकीकरणाचे स्वत:च्या जीवनात सकारात्मक बदल घडवू पाहणाऱ्या मुस्लिम स्त्रीचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. केवळ आपल्या जन्मावर नाही तर जन्माआगोदरही जिच्या अस्तित्वावर नकारात्मक शब्दांचे आसूड ओढले गेले होते. त्या अत्यंत बिकट परिस्थितीतील मुस्लिम स्त्रीने हिमतीने शिक्षण घेवून स्वत:चे जीवन आकारास आणले. वयाच्या

एकोणिसाव्या वर्षापर्यंत चार मुलींची आई होणाऱ्या या स्त्रीने मोठ्या हिमतीने व जिद्दीने एस.एस.सी. ते एम. फिल. पर्यंत शिक्षण घेवून प्राध्यापिकेची नोकरी केली. हा जागतिकीकरणाचा एक सकारात्मक परिणाम पाहायला मिळतो.

'हृदस्थ' मधील अलका मांडके यांचे नीतू मांडके यांच्यासोबत वैद्यकीय क्षेत्रातले कार्य असो, 'समिधा'मध्ये साधना आमटे यांचे बाबांसोबतचे समाजसेवेतले कार्य असो, 'सर आणि मी', 'मी नंदा', कुणास्तव कुणीतरी', 'आयदान', 'संग्राम', 'मेरी गोल्ड', 'मास्तरांची सावली', 'धाकट¶ा नजरेतून' या व इतर सर्व आत्मकथनांतील स्त्रिया कमी अधिक शिकलेल्या आहेत. पण स्वतंत्र विचारांच्या आहेत. जागतिकीकरणाने विकसित आहे. 'बारबाला' या आत्मकथनातील वैशाली हळदणकरचे जीवन मात्र इतर सर्व स्त्रियांपेक्षा वेगळे आहे. जागतिकीकरणाने स्त्रियांना दुहेरी ताणास सामोरेही जावेच लागले. या आत्मकथनातील स्त्रिया कामासाठी, व्यवसायासाठी, नोकरीसाठी घराबाहेर पडतात, तेव्हा त्यांना घर व कामाचे ठिकाण या दोन्ही ठिकाणच्या तणावास सामोरे जावे लागते. जागतिकीकरणाने इतर अनेक उद्योगांची भरभराट केली. त्याप्रमाणे स्त्रियांना, वेश्याव्यवसाय हा देखील पर्यायाने करावा लागला व याचे प्रत्यंतर वैशाली हळदणकरच्या बारबाला या आत्मकथनात वैशालीच्या जीवनकथेतून येतो. तिचे आयुष्यभर जे लैंगिक शोषण होत गेले, त्याला परिस्थिती कारणीभूत ठरत गेली. ती याबाबत परिस्थितीला शरण जाणे हेच कारण मान्य करते.

**संदर्भ सूची :**

१. भागवत विद्युत, स्त्री प्रश्नांची वाटचाल परिवर्तनाच्या दिशेने, प्रतिमा प्रकाशन पुणे, दु. आ. २००९.
२. गुंडी निलिमा, स्त्री–मिती निवडक मिळून साऱ्याजणी मौज प्रकाशन, मुंबई, प्र.आ. २०१०.
३. कुसुमांजली निजरपूण, स्मरणिका मराठी आत्मकथन लेखिकांचे साहित्यसंमेलन २००९.
४. पाटील शोभा, स्त्रीवादी विचार आणि समीक्षेचा मागोवा, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्र.आ. २००७